# अमरावती महानगरपालिका, अमरावती

## जन्म-मृत्यू विभाग

### आवश्यक नियम व पोटनियम यांची माहिती

1. अमरावती महानगरपालिका कार्यक्षेत्रात घडलेल्या जन्म वा मृत्यु बाबत घटनांच्या नोंदी जन्म-मृत्यु विभागात पालकांनी / रुग्णालयांनी 21 दिवसांच्या आंत करणे कायद्याने बंधनकारक आहे. नोंद झालेली आहे याची खात्री करणे हे नागरिकांचे कर्तव्य आहे.
2. संगणकामध्ये नोंद झाल्यावरच दाखला मिळू शकतो. संगणकामध्ये नोंद झाली आहे किंवा कसे याबाबत आपण http://www.amtcorp.org या वेबसाईटवर देखील पाहू शकता. या वेबसाईटवरुन आपला **नोंदणी क्रमांक** व **दिनांक** काढून आणल्यास आपणाला दाखला देणे सहज होते.
3. जर आपल्या दाखल्यामध्ये दुरुस्ती असल्यास जन्म विभाग व मृत्यु विभाग तळमजला येथे दुरुस्ती करुन घ्यावी. (खिडकी क्रमांक 7 व 8 वर दाखल्यामध्ये दुरुस्ती करण्याचे काम केले जात नाही)
4. लक्षात ठेवा! जन्म नोंदणीमध्ये एकदा बालकाचे नाव समाविष्ट केल्यानंतर बालकाचे नावामध्ये बदल करता येत नाही.
5. जन्म-मृत्यु प्रमाणपत्राची प्रत उपलब्ध करुन घेण्याकरीता साध्या कागदावर अर्जामध्ये जन्म तारीख / मृत्यु तारीख, पूर्ण नाव, वडीलांचे / आईचे नांव याचा उल्लेख करावा.
6. दि. 01/01/2000 पूर्वी जन्मनोंद झालेल्या बालकाचे नावाची नोंद घेण्याची संधी शासनाने दि. 31/12/2014 पर्यंत उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी आपण आजच जन्म-मृत्यु नोंदणी विभागात आवश्यक त्या पुराव्यासह विहित नमुना फॉर्ममध्ये माहिती भरुन द्यावी व आपल्या बाळाचे नावाची नोंद रेकॉर्ड वर करुन घ्यावी. मुदतीनंतर कुठलीही फेरफार वा दुरुस्ती केली जाणार नाही. त्यामुळे आजच या संधीचा लाभ घ्यावा ही विनंती.

जन्म-मृत्यू निबंधक<br>
तथा<br>
वैद्यकीय आरोग्य अधिकारी<br>
महानगरपालिका, अमरावती